# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्र-३४५/२०२४** **दिनांक-१०/०९/२०२४.**

## "घरफोडी करुन चोरी करणाऱ्या साराईत आरोपीताला अटक करुन त्याच्याकडुन रोख रक्कम व १३ मोबाईल फोन असे एकुण ९२,०००/ रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात काशीगांव पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश"

दि.०८.०९.२०२४ फिर्यादी नांमे हरिम नबी अन्सारी, रा. मांडवी पाडा, आण्णा मंदीरा जवळ, काशिगांव, मिरारोड यांनी फिर्याद दिली कि, सकाळी त्यांच्या राहत्याघरी झोपेतुन उठले असता त्यांना त्यांचा मोबाईल फोन बिछाण्यात मिळुन आला नाही त्यांनी त्यांची पत्नी यांना झोपेतुन उठवले तीला सुध्दा तीचा मोबाईल फोन मिळुन आला नाही तसेच त्यांना घरातील सामान आस्तव्यस्त झालेले व घराच्या दरवाज्याजा उघडा दिसला त्यावेळी त्यांची खात्री झाली कि, रात्रीच्या वेळी घराची कडी कोयंडा तोडुन कोणीतरी अनोळखी इसमाने रात्रीच्यावेळी त्यांच्याघरी येवुन घरफोडी करुण मोबईल फोन व रोख रक्कमेची चोरी केली आहे. नमुद तक्रारादार यांच्या तक्रारी वरुण दिनांक ०८/०९/२००४ काशिगांव पोलिस स्टेशन गु.र.नं २७८/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३०५ (ए) ३३१ (४), ३३१ (१) प्रमाणे अनोळखी इसमा विरुद्ध चोरीचा गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस ठाणेच्या हद्दीत वारंवार मोबाईल चोरीच्या घरफोडी करण्याच्या तक्रारी वाढल्याने वरिष्ठांनी आरोपीताचा शोध घेवुन नमुद गुन्हा उघड करण्याच्या सुचना गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी अंमलदार यांना दिल्या होत्या त्या प्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज व मोबाईल तांत्रिक विश्लेषणातुन आरोपी नांमे **अब्दुल रेहमान ताहीर बड्डु, रा. रुम नंबर १०४, पहिला माळा, जामा मस्जिद जवळ, काठीटावाड हॉटेल मागे, नालासोपारा पुर्वे, ता.वसई जिल्हा पालघर** यांस अटक करुण त्याच्याकडुन नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांचे चोरी केलेले दोन मोबाईल फोन, रोख रक्कम तसेच त्याने या व्यक्तरिक्त इतर **ठिकाणी चोरी केलेले सॅमसंग,ओप्पो,वन प्लस व व्हीवो** इत्यादी कंपनीचे ११ मोबाईल फोन असे एकुण ९२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपीताकडुन हस्तगत करण्यात आला आहे.

अटक आरोपी नामे **अब्दुल रेहमान ताहीर बड्डु** हा चोरी, घरफोडी इत्यादी गुन्हे करण्यात साराईत असुन त्याच्या विरुद्ध खालील गुन्हे दाखल आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. |
|---|---|---|
| १ | मांडवी पोलीस स्टेशन | १८६/२०२४ भा.द.वि कलम ३२४ प्रमाणे. |
| २ | मांडवी पोलीस स्टेशन | १६०/२०२४ भादविस कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे. |
| ३ | मिरारोड पोलीस ठाणे | १६३/२०२२ भादविस कलम ४५७,३८० प्रमाणे. |

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, वपोनि/राहुलकुमार पाटील, काशिगांव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगांव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी केली असुन घरफोडीचा गुन्हा उघड करुण साराईत आरोपीताला अटक केली आहे.




-----------ooooo----------